दिनांक ३१/१२/२०१९ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने " **BEST CONVICTION OF THE MONTH** " माहे ऑक्टोंबर–२०१९ या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ऑक्टोंबर – २०१९

| | | |
|---|---|---|
| ०१ | विलेपार्ले पोलीस ठाणे परिमंडळ–०८ | गु.र.क्र. ४०२/२०१६ कलम ३०२, ३७६,३७७,४४९, ४३६,२०१ भादवि. |

### –: लैंगिक अत्याचार करुन खून करुन पुरावा नाहीसा करणे:–

गुन्हयाची थोडक्यात हकिकत:– दि.०५/१२/२०१६ रोजी रात्री २३.३० ते दि.०६/१२/२०१६ च्या दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने कुमारी श्रध्दा काशिनाथ पांचाळ, वय २४ वर्षे हीचे राहते घरामध्ये घुसून तिचेवर जबरी संभोग व अनैसर्गिक संभोग करुन तिचा जीन्स् पॅन्टने गळा आवळून खुन केला आणि गुन्हयाचा पुरावा नाहीसा करण्याच्या उदद्देशाने घरामध्ये आग लावून पळून गेला. सदर प्रकरणी बळीत मुलीचे वडील श्री काशिनाथ शंकर पांचाळ यांच्या जबाबावरुन गुन्हा दाखल करण्यात केला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :– | काशिनाथ शंकर पांचाळ वय ५३ वर्षे. |
| बळीत/मयत | :– | कुमारी श्रध्दा काशिनाथ पांचाळ वय २४ वर्षे. |
| आरोपी अटक व दिनांक | :– | देबाशिष नंदलाल धारा, वय २७ वर्षे.<br>२८/०१/२०१९ |
| निकाल दिनांक | :– | ०४/१०/२०१९ |
| दोषसिध्दीचा तपशील | :– | मा. सत्र न्यायालय क्र. ११ यांनी दोषी ठरवून खालीलप्रमाणे सजा सुनावली आहे.<br>१) कलम ३०२ भादवि करीता फाशी व रु.१०,०००/– दंड आणि दंड न भरल्यास ३ महिने साधी कैद.<br>२) कलम ३७६ (अ) भादवि करीता फाशी व रु.१०,०००/– दंड आणि दंड न भरल्यास ३ महिने साधी कैद.<br>३) कलम ३७६(२)(एम) भादवि करीता मरेपर्यंत आजीवन कारावास व रु. १०,०००/– दंड आणि दंड न भरल्यास ३ महिने कैद.<br>४) कलम ३७७ भादवि करीता सश्रम जन्मठेव व रु.५०००/– दंड आणि दंड न भरल्यास ०१ वर्षे कैद.<br>५) कलम ४४९ भादवि करीता सश्रम जन्मठेप व रु.५०००/– दंड आणि दंड न भरल्यास ०१ वर्षे कैद.<br>६) कलम ४३६ भादवि करीता सश्रम जन्मठेप व रु.५०००/– दंड आणि दंड न भरल्यास ०१ वर्षे कैद.<br>७) कलम २०१ भादवि करीता ०७ वर्षे सश्रम कारावास व रु.१०००/– दंड आणि दंड न भरल्यास ०३ महिने कैद.œ |

<u>तपास कौशल्य</u> :— सदर गुन्हा अज्ञात आरोपीविरुद्ध दाखल झाला होता व गुन्हयाचे कोणीही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसतांना गुन्हयाचे तपासी अधिकारी व पथकाने अथक मेहनत घेवून गुन्हयाचे घटनास्थळ परिसरातील अनेक सिसिटीव्ही फुटेजची पाहणी केली असता गुन्हा घडला त्या रात्री घटनास्थळाचे परिसरामध्ये एक अनोळखी इसम संशयितरित्या लोकांचे घरामध्ये डोकावत असल्याचे दिसून आले. तपास पथकाने महत प्रयासाने सदर संशयित इसमाबाबत तपास करुन सदरचा संशयित इसम हा विलेपार्ले पुर्व परिसरातील श्रद्धानंद रोड येथील साई ज्वेलर्स या दुकानामध्ये काम करणारा कारागीर देबाशिष नंदलाल धारा हा असल्याची माहिती मिळविली.

सदर पतास अधिकारी सपोनि देवकाते यांनी संशयित देबाशिष धारा यास त्याचे मुळ गाव चायपथ, बंगाल येथून दि.२८/०१/२०१७ रोजी अटक केली. आरोपीकडून गुन्हयात वापरलेला कंगवा व कपडे निवेदन पंचनाम्यांतर्गत हस्तगर करण्यात आले.

तपासी अधिकारी व पथकाने तांत्रिकदृष्टया गुन्हयाचा तपास करुन बळीत मुलीचे गुप्तांगामध्ये व घटनास्थळावरुन हस्तगत चादरीवरील संशयिताचे रक्तमिश्रीत विर्याचे डी.एन.ए. नमुने प्राप्त केले होते. सदरचे नमुने अटक आरोपीच्या डी.एन.ए.नमुन्यासोबत जुळून आले. तसेच आरोपीकडून निवेदन पंचनाम्याअंतर्गत हस्तगत कंगवा व आरोपीने गुन्हा करतांना परिधान केलेल्या कपडयांवर सापडलेल्या रक्ताचे डी.एन.ए.नमुन्यासोबत बळीत मुलीचे डी.एन.ए. जुळून आले. सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसून आलेला गुन्हयाचे घटनास्थळाचे परिसरात फिरणारा संशयित अनोळखी इसम हा अटक आरोपी देबाशिष धारा असल्याबाबत एफ.एस.एल.कलिना यांचे तज्ञांकडून अहवाल प्राप्त केला. तसेच आरोपीचे मोबाईलचे लोकेशन गुन्हा घडला त्यावेळी गुन्हयाचे परिसरामध्ये असल्याबाबत माहिती प्राप्त केली.

केसच्या सुनावणी कामकाजासाठी नेमलेले विशेष अधिकारी पो.उ.नि.आव्हाळे, कोर्ट कारकुन पोह २८००४३/कांबळे व पो.शि.०३१२४४/थोरवत यांनी गुन्हयाचे साक्षीदार व पंच यांचेसोबत समन्वय साधुन त्यांना सुनावणी तारखेस वेळोवेळी हजर केल्याने सरकारी पक्षातर्फे समर्थपणे साक्ष दिली. सरकारी पक्षातर्फे विशेष सरकारी अभियोक्ता श्री राजा ठाकरे यांनी योग्यरित्या बाजु मांडल्याने अटक आरोपी देबाशिष नंदलाल धारा यास मा. न्यायालयाने फाशी व कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

**सदर विलेपार्ले पोलीस ठाणे पथकातील तपासी अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | सपोआ | लक्ष्मण चव्हाण | प्रशस्तीपत्र |
| २ | पोनि | महादेव निंबाळकर | प्रशस्तीपत्र |
| ३ | सपोनि | वसंत देवकते | रु.५००० व प्रशस्तीपत्र |
| ४ | मपोउनि | माधवी कडव | रु.५००० व प्रशस्तीपत्र |
| ५ | पोउनि | अमित आव्हाळे | रु.५००० व प्रशस्तीपत्र |
| ६ | पोहक्र.२८०४३ | आदेश कांबळे | रु.१००० व प्रशस्तीपत्र |
| ७ | पोशिक्र ०३ १२४४ | प्रकाश थोरवत | रु.१००० व प्रशस्तीपत्र |
| ८ | पोशिक्र ०५०७७८ | अनिल भोसले | रु.१००० व प्रशस्तीपत्र |

—————————